


॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

मंगल देशा! पवित्र देशा!
महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा,
श्री महाराष्ट्र देशा ।।

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

■ अहमदनगर ■ बुधवार, दि. १ मे २०२४ ■ वर्ष ५ वे ■ अंक ६१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145




मोदींमुळे भारतमाता विश्वरुपपदावर आरुढ होणार

पान क्र. २ वर



योजनांची प्रभावी अंमलबजावणी हे मोदी सरकारच्या विजयाचे सुत्र

पान क्र. ३ वर



देशाला मोदींसारख्या कणखर नेतृत्वाची गरज

पान क्र. ४ वर

## उद्या अंक नाही

बुधवार, दि. १ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त वीरभूमी कार्यालयास सुट्टी असल्याने गुरुवार, दि. २ मे २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

# नीलेश लंकें समर्थकांवर पैसे वाटपाचा गुन्हा

### ६० हजार रुपयांची रोकड जप्त । राहुल झावरेंसह तिघे जण पैशासंह हॉटेलात सापडले

● **नगर । वीरभूमी –**

नगर लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार निलेश लंके यांच्या समर्थकासह दोघांना नगर शहरातील एका हॉटेलच्या रुममध्ये पैशाची पाकिटे वाटप करताना भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले. या तिघांकडून प्रत्येकी वीस हजार याप्रमाणे ६० हजार रुपये आणि दोन मोकळी पाकिटे जप्त करण्यात आली.

याप्रकरणी राहुल बबन झावरे (ता. पारनेर), अनिकेत राजू यादव (रा. भिंगार), विलास गोविंद चिवडे (मुनिसिपल कॉलनी, मुंबई) यांच्याविरोधात लोकसभा निवडणूक आचारसंहिता भंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस कॉ. सतिष मारुती शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात १६ मार्च २०२४ पासून आचारसंहिता लागू आहे.



निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारांना आर्थिक प्रलोभन दाखविणाऱ्या संबधित पक्षाच्या लोकांवर कारवाई करण्यासाठी भरारी पथक कार्यरत करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम संयुक्त कारणाशिवाय जवळ बाळगता येणार नाही, असे निर्देश निवडणूक आयोगाने दिलेले आहेत. निवडणूक काळात पैसे वाटप होत असल्याच्या तक्रारी येतात. त्यामुळे अशा घटना रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने भरारी पथकांची नियुक्ती केलेली आहे.

सोमवारी नगर शहरातील हॉटेल यश ग्रैंड येथील रुम नंबर ४०२ मध्ये पैसे वाटप सुरु असल्याची माहिती या पथकाला मिळाली होती. त्यामुळे या पथकाने तेथे छापा टाकला असता तिघांकडे सुमारे ६० हजार रुपये आढळून आले. यात तिघांकडे खाकी रंगाच्या पाकिटामध्ये ठेवलेले पैसे होते. खाकी रंगाच्या पाकिटात ५०० रुपयांच्या ४० नोटा याप्रमाणे २० हजार रुपये असे तिघांकडे एकूण ६० हजार रुपये आढळून आले.

महसूल व पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश असणारे निवडणूक आयोगाचे भरारी पथक हॉटेलच्या रुममध्ये धडकताच या पथकासोबत राहुल झावरे याने वाद घातला आणि तुम्हाला पाहून घेऊ अशी धमकीही दिली. मात्र, पथकातील अधिकाऱ्यांनी खमकी भूमिका घेतली आणि कारवाई केली. या कारवाईत वीस हजार रुपयांची तीन पाकिटे (६० हजार रुपये) जप्त करण्यात आली.

याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात आदर्श आचारसंहितेच्या भंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार राजेंद्र गर्गे हे करत आहेत. दरम्यान पथकाने जप्त केलेल्या पैशांबाबत चौकशी सुरु असल्याचे पोनि. प्रताप दराडे यांनी सांगितले.

### पोलिस व राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांच्यात वाद

■ निवडणूक भरारी पथकाचा छापा पडल्याची माहिती समजताच काही राजकीय पक्षांचे पदाधिकारीही कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल झाले. तेथे पोलिस व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये वाद झाला. यामुळे तेथे काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी पोलिसांकडून ही कारवाई चुकीची होत असल्याचे पदाधिकाऱ्यांचे म्हणणे होते. मात्र, पोलिस आपल्या कारवाईवर ठाम राहिले.

## SPOT NEWS

### येत्या २४ तासांत पारा वाढणार

● **पुणे ।** राज्यातील अनेक भागात उष्णतेचा चटका चंगलाच वाढला आहे. त्यातच महाराष्ट्रात पुढील २४ तासांत उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. तर विदर्भ, मराठवाड्यात पावसाची शक्यता कायम आहे. राज्यातील हवामानात सातत्याने बदल होत आहेत. त्यातच कुठे ऊन तर कुठे पाऊस अशी परिस्थिती असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार १ मे रोजी राज्याच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. त्यानंतर दोन दिवस राज्यात सामान्य वातावरण पाहायला मिळणार आहे. तर पुन्हा ३ मेपासून राज्यात तापमान वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना उन्हात बाहेर पडताना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### उत्तर पश्चिम मुबईतून रवींद्र वायकर

● **मुंबई ।** शिवसेनेच्या शिंदे गटाने मंगळवारी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून रवींद्र वायकर यांना उमेदवारी देण्याची घोषणा केली आहे. त्यांचा सामना आता ठाकरे गटाचे अमोल किर्तीकर यांच्याशी होणार आहे. मुंबईतील जोगेश्वरी येथील आमदार असलेले वायकर हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करण्यापूर्वी उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय होते. त्यांनी शिंदे गटात आयत्यावेळी प्रवेश केला आणि ही उमेदवारी मिळवली.

## बांधकाम व्यावसायिकाची ९९ लाखांची फसवणूक

● **नगर । वीरभूमी –**

शहरातील तेलीखुंट भागातील जुनी इमारत पाडून नवीन इमारत उभी करण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाशी करारावर ती जागा विकसित करण्यास दिली. त्याबदल्यात त्याच्याकडून ९८ लाख ९९ हजार रुपये घेऊन ती जागा परस्पर दुसऱ्यास विक्री करीत बांधकाम व्यावसायिकाची फसवणूक केल्याच्या आरोपावरून आठ जणांविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

गिरीश प्रकाश लोखंडे, कांता प्रकाश लोखंडे, ज्ञानेश्वर मनोहर लोखंडे, पद्मा ज्ञानेश्वर लोखंडे (तिघे रा. सिव्हील हाडको नगर), चंद्रकांत मनोहर लोखंडे, शोभा चंद्रकांत लोखंडे, (दोघे रा. हवेली, पुणे) संतोष संभाजी नाळे (रा. नाळे वस्ती, पुणे), उदयसिंग माणिकसिंग ठाकूर (रा. शुक्रवार पेठ, पुणे) अशी आरोपींची नावे आहेत.

बांधकाम व्यावसायिक अनिल बबनराव जाधव (रा. बोल्हेगाव फाटा, अहमदनगर) यांनी सोमवारी (दि. २९) रात्री उशिरा कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. जाधव यांची दयानंद बिल्डर्स, डेव्हलपर्स या नावाची फर्म आहे. या फर्म मार्फत ते शहर व परिसरात बांधकाम तसेच जागा विकसित करण्याचे काम करतात. त्यांच्या फर्म सोबत १२ ऑगस्ट २०२२ रोजी गिरीश प्रकाश लोखंडे, कांता प्रकाश लोखंडे, ज्ञानेश्वर मोहन लोखंडे, चंद्रकांत मनोहर लोखंडे, शोभा चंद्रकांत लोखंडे, पद्मा ज्ञानेश्वर लोखंडे आदींनी करारनामा केला. त्यात त्यांची शहरातील तेलीखुंट येथील जुनी इमारत पाडून त्या जागी नवीन इमारत बांधण्यासाठी ती जागा अनिल जाधव यांच्या दयानंद बिल्डर्स, डेव्हलपर्स फर्मला दिली होती. त्या विकसन करापोटी सर्वांनी जाधव यांच्या कडून ९८ लाख ९९ हजार ८९१ रुपये रोख व धनादेश स्वरुपात घेतलेले होते.






## पागिरवाडी येथे वीज शॉर्टसर्किटने घराला आग; आगीत गॅस टाकीचा स्पोट होवून घर जळून खाक

● **अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील पागिरवाडी मुथाळणे येथील पोपट बंडू हळकुंडे यांचे राहते घरास मंगळवार दि. ३० एप्रिल रोजी पहाटे १ वाजता वाजण्याच्या सुमारास आग लागली. विजेच्या शॉर्टसर्किटमुळे घराला आग लागून गॅस टाकीचा स्फोट झाला. स्फोट इतका भीषण होता की, काही कळण्याच्या आत घराला लागलेल्या आगीने पूर्ण घर जळून खाक झाले. घराला आग लागली त्या वेळेस हळकुंडे कुटुंब उन्हाळ्याचे दिवस असल्याने घराच्या बाहेर अंगणात झोपलेले होते. घराला लागलेल्या आगीने गॅस टाकीचा स्फोट झाला. सर्व कुटुंब झोपेतून जागे झाले. तसेच शेजारी असलेले कुटुंबातील सदस्य आणि काही वेळातच पागिरवाडी सर्व गाव घर विझवण्यासाठी मदतीला



आले. घरातील बांधलेली जनावरे या लागलेल्या आगीतून अत्यंत शिताफीने बाहेर काढण्यात आली. मात्र घराला लागलेली आग इतकी प्रचंड मोठी होती की, आगीत पूर्ण घर जळून खाक झाले.

अकोले येथून अग्निशामक बंब बोलवण्यात आला. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. महसूल विभागाचे तलाठी यांनीही सकाळी घटनेचा तात्काळ पंचनामा करण्याचे मान्य केले आहे. मात्र शासकीय मदत जेव्हा मिळेल तेव्हा मिळेल. मात्र माणुसकीच्या नात्याने हळकुंडे कुटुंबाला मदत करण्यासाठी वस्तू, धान्य, कपडे, रोख स्वरूपात मदत करावी. पोपट बंडू हळकुंडे यांचे आई - वडील यांचे काही वर्षांपूर्वी निधन झाले आहे. त्यांचे मोठे भाऊ यांचेही एक दुर्धर आजाराने निधन झाले आहे. हळकुंडे कुटुंब आपली जिरायत शेती आणि मोलमजुरी करत जगत आहे. तेव्हा आपण आपल्याला जी मदत करता येईल. ती मदत करावी असे आवाहन समस्त पागिरवाडीकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# SPOT NEWS

## मारहाण करून जखमी करणाऱ्या दोघांवर गुन्हा

**● नगर । वीरभूमी –**

दोघांनी एकाला टोकदार वस्तूने मारहाण करून जखमी केले. निसार अहमद फतिममहंमद कुरेशी (वय ४३ रा. सदरबाजार, भिंगार कॅम्प) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मारहाण करणाऱ्या दोघा संशयितांविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समीर गफुर शेख, अल्फआईज समीर शेख (दोघे रा. वाघस्कर गल्ली, भिंगार) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. सदरची घटना शनिवारी (दि. २७) १०:४५ वाजता भिंगार शहरात घडली असून गुन्हा रविवारी (दि. २८) दुपारी दाखल झाला आहे. समीर व अल्फआईज हे दोघे निसारच्या चुलत भावाकडे असलेल्या पैशाची मागणी करण्यासाठी गेले होते. तेव्हा फोनवरून समीर याने फिर्यादी निसार यांना शिवीगाळ केली. दरम्यान निसार हे घरी जात असताना समीर व अल्फआईज यांनी थांबण्यास सांगितले. ते थांबले असता दोघांनी शिवीगाळ करून टोकदार वस्तूने मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## अरणगावमधील श्रीकृष्ण मंदिरात श्री पंचावतार महापूजा

**● नगर । वीरभूमी –**

तालुक्यातील अरणगाव येथील श्रीकृष्ण मंदिरात कलशारोहण सोहळ्यानिमित्त ११०० दाम्पत्यांसह श्री पंचावतार महापूजा सोहळा, तसेच दीक्षा विधी कार्यक्रमाचे आयोजन ५ मे ते १२ मे २०२४ पर्यंत करण्यात आले आहे. राज्यासह सूरत (गुजरात) मधील दाम्पत्य या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. या सोहळ्यानिमित्त प.पू. महंत आचार्य बाभूळगावकर बाबा शास्त्री, करमाड यांच्या समधूर वाणीतून संगीत श्रीमद्भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे, तसेच पोथीप्रवाचक प.पू.मं. आचार्य न्यायंबास बाबा शास्त्री (मकर धोकडा) यांचे पोथी प्रवचन होईल. दररोज सकाळी ९ ते ११.३० पर्यंत विविध संतमहंतांचे विविध विषयांवर प्रवचन होईल. भक्तांनी या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन चक्रपाणी महानुभाव आश्रम, अरणगावचे संचालक आचार्य निमगावकर बाबा उपाख्य राजेंद्र मुनी विराट यांनी केले आहे. ॲड. बाबासाहेब रणसिंग, इंजि. चंद्रशेखर जगताप, भगवान अनारसे, देवाशेठ धोंडे, पुरुषोत्तम भोसले, पंचकृष्ण उत्सव सेवा समिती व सर्वज्ञ युवा सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य मंदिर कलशारोहण सोहळा कमिटी सदस्य, अरणगाव ग्रामस्थ आदींनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले आहे.

## राज्यस्तरीय मोडी लिपी स्पर्धा

**● नगर । वीरभूमी –**

ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्र अहमदनगरच्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्र दिनी (दि.१ मे) ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व जागतिक मोडी लिपी प्रसार समितीच्या संयुक्त विद्यमाने आठव्या राज्यस्तरीय मोडी लिपी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, अहमदनगर , नाशिक आणि कोल्हापूर या पाच शहरात एकाच दिवशी आणि एकाच वेळी सुंदर मोडी हस्ताक्षर स्पर्धा आणि शीघ्र मोडी लिप्यंतर स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. मोडी लिपी प्रचारार्थ भव्य स्पर्धाचे हे आठवे वर्ष आहे. ही स्पर्धा १ मे रोजी सकाळी १० वाजता होणार असून, या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्वच केंद्रावरील दोन्ही स्पर्धा गटातील सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. प्रवेशपत्र हे केंद्रावरच भरावयाचा आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भक्ती, कर्म आणि ज्ञान योगातून

# भारतमाता विश्वरूपपदावर आरुढ होणार

### खा. डॉ. सुजय विखे पाटील । जामखेड येथील मुंगेवाडी येथे महायुतीची प्रचारसभा

**● जामखेड । वीरभूमी –**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतमातेची सेवा करण्याचे दायित्व खांद्यावर घेतले आहे. आपली भारतामाता मोदींच्या भक्तीयोगातून, कर्मयोगातून आणि ज्ञानयोगातून पुन्हा एकदा विश्वरूपदावर आरूढ झाल्याशिवाय राहणार नाही, असा आत्मविश्वास महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला आहे. यामुळे तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी कामाला लागा असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. ते जामखेड येथील महायुतीच्या प्रचार सभेत बोलत होते.



अहिल्यानगर लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असून डॉ. सुजय विखे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आपण केलेल्या विकास कामे घेऊन ते मतदारांसमोर जात आहेत. जामखेड मधील मुंगेवाडी येथे मंगळवारी महायुतीच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. राम शिंदे, रवी सुर्वसे, बाळासाहेब भोसले, योगेश सुर्वसे, राजू भोसले, अण्णा सुर्वसे यासह स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. विखे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे व्यक्तिमत्व, कार्यशैली निर्णयक्षमता, दूरदृष्टी, विकासाचा ध्यास आणि देशाप्रती असलेली कळकळ देशाने पाहिली आहे. यामुळे तिसऱ्यांदा त्यांना पंतप्रधान पदाची धुरा सांभाळण्याची संधी जनतेकडून दिली जाणार आहे. मोदींची तिसऱ्या पर्वाकडे दमदार वाटचाल सुरू आहे. त्याचा आपल्याला हिस्सा व्हायचा आहे. असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.

यावेळी सभेला उपस्थित असणारे आमदार प्रा. राम शिंदे यांनी सुद्धा कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, खासदार डॉ. सुजय विखे यांनी मागील पाच वर्षात जिल्ह्याच्या विकासात कोणतीही कसर सोडली नाही. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध लोक कल्याणकारी योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक गावागावात पोहचविला आहे. त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील तरूणांना रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. विखे यांनी मागील पाच वर्षात जिल्ह्यातील दळण वळणाच्या सेवा सुविधा वाढविण्यावर भर दिला आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोगार देण्याचे काम केले आहे. त्यांनी जिल्ह्याला केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सर्वाधिक निधी आणण्याचे काम केले. यामुळे असा खासदार येणाऱ्या काळात जिल्ह्याच्या विकासासाठी काम करेल. यामुळे त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देणे गरजचे आहे. असे आवाहन त्यांनी दिले.

## ‘ओबीसींनी ओबीसींना सहकार्य करा’ या आशयाचे फलक झळकले, दोघांवर गुन्हा

**● नगर । वीरभूमी –**

‘ओबीसींनी ओबीसींना सहकार्य करा’ या आशयाचे सुमारे १४ फलक नगर शहरात लावल्याप्रकरणी दोघांविरूध्द येथील तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र काशिनाथ पडोळे (रा. टिळक रस्ता, नगर), प्रकाशक रियाज अब्दुलअजिज सय्यद (रा. शिरीनबाग, बॉम्बे हाऊसिंग सोसायटीजवळ, मुकुंदनगर) यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महानगरपालिकेचे नगररचनाकार तथा आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी सर्वेश खुशालराव चाफळे यांनी फिर्याद दिली आहे. महानगरपालिकेने दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन करून निवडणूक निकालावर परिणाम करण्याच्या उद्देशाने प्रक्षोभक मजकूर छापल्याबद्दल भा.दं.वि. कलम १८८ आणि १७१ (ग) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र पडोळे याने लोकसभा नगर दक्षिण मतदार संघासाठी अपक्ष अर्ज दाखल केलेले दिलीप खेडकर यांच्या प्रचारार्थ नगर शहरात अधिकृत असलेले फलक प्रचार जाहिरात करण्याकामी विविध ठिकाणी परवानगी मागितली होती. मनपाने पडोळे यांना अटी व शर्तींवर परवानगी दिली होती. दरम्यान रविवारी (दि. २८) निवडणूक आयोगाच्या ॲपवर यासंदर्भात तक्रार दाखल झाली होती. त्या तक्रारीची दखल घेऊन मनपाने पडोळे व सय्यद विरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. कारवाई करून ते सर्व फलक काढण्यात आले आहेत. दरम्यान जाहिरातीसाठी रितसर होर्डिंगची नोंदणी केलेली असतानाही गुन्हा दाखल केला आहे. सत्ताधाऱ्यांच्या दबावापोटी ही कारवाई केली, असा आरोप खेडकर यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

## मारुती मेंगाळ कधी मौन सोडणार?

### लोकसभेसाठी काय भूमिका घेणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष

**● अकोले । वीरभूमी –**

शिर्डी लोकसभा मतदार संघाची निवडणूक जाहीर झाली असून महायुती, महाविकास आघाडी व वंचित आघाडी यांच्या मध्ये मुख्य लढत होण्याची शक्यता आहे.

अकोले तालुक्यात महायुती मध्ये भाजप शिवसेना, राष्ट्रवादी, आर. पी. आय., मनसे यांची युती आहे. अकोले तालुक्यात महायुती ने संकल्प मेळावा घेतला. त्यामध्ये भाजप, मनसे, राष्ट्रवादी सक्रिय दिसली होती.

मात्र राष्ट्रवादीचे युवानेते, आमदारकीच्या स्पर्धेत असलेले अकोले पंचायत समितीचे माजी उपसभापती मारुती मेंगाळ यांनी अद्याप पर्यंत आपले मौन सोडलेले नाही. ते महायुतीच्या प्रचारात सक्रिय झालेले नाही. त्यांनी कोणतीही भूमिका स्पष्ट केलेली नाही, शिवाय ते कोणत्याही प्रचार यंत्रणामध्ये सहभागी झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या भूमिकेकडे



तालुक्याचे लक्ष लागलेले आहे.

मारुती मेंगाळ हे ठाकर समाजाचे असून त्यांनी ठाकर समाजातील युवकांचे मोठे संघटन उभे केलेले आहे. त्याशिवाय त्यांचा जन संपर्क दांडगा आहे. मात्र एका बाजूला वाजायला लागलेले असतानाही त्यांच्या अंगात येत नाही. याबाबत ते कोणाच्याही संपर्कात दिसत नाही. त्यामुळे ते काय भूमिका घेतात याकडे सर्व राजकीय पक्षांचे व मतदारांचे लक्ष लागलेले आहे. त्यांना अदयाप पक्षाचा आदेश आलेला नाही का? ते कोणाच्या आदेशाची वाट पहात आहे. ते कोणावर नाराज आहेत का? त्यांच्या या मौना विषयी त्यांच्याच पक्षातील, तालुकाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष यांनी अदयाप पर्यंत चर्चा का केली नाही? अशीही चर्चा तालुक्यात चालू आहे.

देशात मोदी सरकारने अब की बार ४०० पारचा नारा दिलेला आहे. एक एक खासदार निवडून आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. महायुतीचे उमेदवार खा. सदाशिव लोखंडे यांच्या प्रचाराने जोर धरलेला असताना मारुती मेंगाळ यांनी अदयाप पर्यंत संपूर्ण निवडणुक प्रक्रियेबाबत मौन धरलेले आहे. ते कशामुळे नाराज आहे. हे समजण्यासाठी मारुती मेंगाळ हे आपले मौन कधी सोडणार याबाबत तालुक्यात चर्चा होतांना दिसत आहे.

# एस.एस.जी.एम. कॉलेजमधील रयत सेवकांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

**● कोपरगाव । वीरभूमी –**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या, एस. एस. जी. एम. कॉलेजमधील प्र. प्राचार्य डॉ.रमेश सानप तसेच व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील प्रा. वसंत कातोरे, द्विलक्षी अभ्यासक्रम विभागातील प्रा. राजेंद्र साळुंखे हे प्राध्यापकसेवक नियत वयोमानाप्रमाणे व शासकीय नियमाने ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. प्राध्यापकांच्या उन्हाळी सुट्ट्या आणि निवडणूक २०२४ ची कामे यामुळे या सेवकांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ २७ एप्रिल रोजी महाविद्यालयात घेण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे भूतपूर्व सदस्य छबुराव आव्हाड हे होते; तर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा.महेंद्रकुमार काले हे उपस्थित होते. तसेच मा. हिरालाल महानुभाव यांची विशेष उपस्थिती लाभली होती. या मान्यवरांच्या शुभहस्ते तीनही सत्कारमूर्तींचा सपत्नीक स्नेहवस्त्र, मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन महाविद्यालय सेवक कल्याण समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या सत्कारमूर्तींना रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.ॲड. भगीरथ शिंदे आणि महाविद्यालय विकास समितीच्या सर्व सदस्यांनी शुभेच्छा पाठविल्या.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्रमुख अतिथी महेंद्र कुमार काले यांनी, उत्तम सेवापूर्ती सत्कार समारंभ उत्तमप्रकारे आयोजित केल्याबद्दल सेवक कल्याण समितीला धन्यवाद दिले. तसेच प्र. प्राचार्य डॉ. आर. आर. सानप यांनी अहोरात्र आपला वेळ देऊन, दीर्घ काळाचा विचार करून महाविद्यालयीन कामाला न्याय दिला, याचा उल्लेख करून त्यांच्या नेतृत्वाने महाविद्यालयाला मिळालेल्या ए ++ या मानांकनाचे श्रेयही त्यांना दिले. महाविद्यालयाला उच्चतम असा सन्मान प्राप्त करून दिल्याबद्दल त्यांचे तसेच सर्व सहकाऱ्यांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. विशेष उपस्थिती लाभलेले विद्यार्थी सहायक समितीचे अध्यक्ष हिरालाल महानुभाव यांनी मनोगत व्यक्त करताना, आपले सहाध्याही राहिलेल्या या सत्कारमूर्ती मित्रांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रा. साळुंखे, प्रा.कातोरे, प्रा. सानप हे संशोधन कार्य, कर्तुत्व, कार्य कुशलता अशा विविध बाबींतही संपन्न असल्याचे काही प्रसंगांतून त्यांनी दाखवून दिले.

या मान्यवरांबरोबरच महाविद्यालयातील विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब वर्पे यांनी प्राचार्याबरोबर असलेल्या महाविद्यालयीन जीवनापासूनच्या मैत्रीला उजाळा दिला. प्रा. सरोदे मॅडम, प्रा. किशोर पाटील, प्रा. दयानंद सूर्यवंशी, प्रा. व्ही. बी. गायकवाड, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, कला विभागाच्या उपप्राचार्य प्रा. उज्ज्वला भोर, माजी मराठी विभाग प्रमुख प्रा. शीला गाढे, स्नेही मनीषा बारबिंड, रोहन पाटील इत्यादींनीही सत्कारमूर्तींच्या आठवणींना उजाळा देऊन त्यांच्या कार्याचा गुणगौरव केला. सर्वांच्याच मनोगतातून प्र. प्राचार्य डॉ. रमेश सानप यांचे नेतृत्व, कर्तृत्व, त्यातून महाविद्यालयाचा झालेला कायापालट व महाविद्यालयाला मिळालेले नॅकचे ए ++ मानांकन या बाबी अधोरेखित केल्या गेल्या.




अतिशय भावपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या या सेवापूर्ती सत्कार समारंभात सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्तींनीही आपली मनोगते व्यक्त केली. प्रा वसंत कातोरे आणि प्रा. राजेंद्र साळुंखे यांनी विद्यार्थी अवस्थेपासून तर सेवेची संधी मिळून सेवापूर्तीपर्यंत आपल्याला कै.मा. काळे साहेब यांच्यापासून अनेक मान्यवरांचे अमूल्य सहकार्य व योगदान कसे लाभले ते सांगून त्यांच्याविषयी, रयत शिक्षण संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तर प्र. प्राचार्य डॉ. रमेश सानप यांनी आपल्या या दोन्ही सहकाऱ्यांनी केलेल्या कामाचा गौरव करून त्यांना उर्वरित आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थी, प्राध्यापक, समिती प्रमुख, नॅक समन्वयक आणि प्र.प्राचार्य अशा विविध भूमिकांमध्ये काम करण्याची संधी आपल्याला कशी मिळाली, ते सांगून आपल्यावर विश्वास टाकणाऱ्या रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे तसेच इतर अनेक मान्यवरांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. शारीरिक व्याधींमध्ये पत्नीची खंबीर साथ मिळाल्याचा उल्लेख करून त्यांनी पत्नी आणि आपल्याला घडविणाऱ्या आई-वडिलांविषयीही भावपूर्ण शब्दांत कृतज्ञता व्यक्त करुन आपल्या यशस्वी वाटचालीत त्यांचा मोलाचा वाटा व स्थान असल्याचे सांगितले. या तीनही सत्कार मूर्तींच्या स्नेहींपरीवाराथिल आणि कुटुंबातील अनेकजण उपस्थित होते त्यांनी सदर प्रसंगी सत्कार मूर्तींचा सत्कार केला.

सदर कार्यक्रमासाठी हिरालाल महानुभाव यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच महाविद्यालयातील तीनही शाखांचे उपप्राचार्य, आप्तेष्ट, मित्रपरिवार यांसह पंचक्रोशीतील अनेक मानवरांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन अधीक्षक श्री. सुनील गोसावी, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार प्रा.एस.एस.शिंदे यांनी व्यक्त केले. प्रा. डॉ. वैशाली सुपेकर, प्रा. रवींद्र हिंगे यांनी सूत्रसंचालन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालय सेवक कल्याण समितीचे चेअरमन, सदस्य व आयोजकांनी केले होते.

# SPOT NEWS

## प्रविणऋषीजी म.सा. यांचे गुरुवारपासून आनंदधाम येथे विविध धार्मिक कार्यक्रम

**● नगर । वीरभूमी –**

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे सुशिष्य तथा अर्हम विज्ञा प्रणेता पूज्य उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा. दि. २ ते ४ मे २०२४ दरम्यान नगरला येणार आहेत. तीन दिवस त्यांचे आनंदधामच्या पवित्र प्रांगणात विहार असणार असून श्रावक श्राविकांना त्यांच्या सान्निध्याचा लाभ मिळणार आहे, अशी माहिती आयोजक नरेंद्र फिरोदिया व सुनील मुनोत यांनी दिली. गुरूवार दि. २ मे रोजी सकाळी ७.३० वाजता पू. प्रविणऋषीजी म. सा. यांचे यश पॅलेस चौकात आगमन आणि स्वागत होईल. यानंतर सकाळी ८.१५ वाजता आनंदधाम येथे त्यांची गुरू भक्ती विषयावर धर्म सभा होणार आहे. दुपारी २ ते ४ यावेळेत त्यांच्या दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येईल. सायंकाळी ४.३० ते ५.३० यावेळेत ते महिलांना आवो रसोई घर को मंदिर बनाये याविषयी मार्गदर्शन करतील. रात्री ८ ते ९ यावेळेत आज और कलकी चुनौती या विषयावर त्यांचे प्रवचन होणार आहे. यात १५ मिनिटे प्रश्नोत्तरे असतील. शुक्रवार दि. ३ मे रोजी सकाळी ८.३० ते ९.३० यावेळेत दान, धर्म आणि व्यवस्था या विषयावर त्यांचे प्रवचन होणार आहे. यानंतर गौतम निधी कलश संकलन आणि गौतम निधी कलश वितरण कार्यक्रम होणार आहे. दुपारी २ ते ४ यावेळेत त्यांच्या दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येईल. सायंकाळी ४.३० ते ५.३० यावेळेत महिला भगिनींना दर्शनाचा लाभ मिळणार आहे. यावेळी आवो रसोई घर को मंदिर बनाये याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. रात्री ८ ते ९ यावेळेत स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावर त्यांचे प्रवचन होणार आहे. यात १५ मिनिटे प्रश्नोत्तरे असतील. शनिवार दि. ४ मे रोजी सकाळी ८.३० ते १० यावेळेत मेरा परिवार मेरी ताकद या विषयावर प्रवचन होणार आहे. दुपारी ४ ते ५ यावेळेत पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा कृतज्ञता समारंभ होणार आहे.

## तरुणाच्या मोबाईलची चोरी

**● नगर । वीरभूमी –**

शिक्षण, नोकरीनिमित्त नगर शहरातील सावेडी नाका परिसरात वास्तव्यास असलेल्या युवकाचे दोन मोबाईल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले. याप्रकरणी प्रनय संजय मंडळकर (वय २४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंडळकर यांच्यासह त्यांचे मित्र संकेत गोरक्षनाथ पोंदे (रा. सोनई ता. नेवासा), कल्पेश शिवाजी चौधरी (रा. जळगाव), प्रज्वल महेंद्र डहाळे (रा. नांदेड) असे एकत्र सावेडी नाका येथे राहतात. शनिवारी (दि. २७) रात्री मंडळकर व त्यांचे मित्र मोबाईल उशाला ठेऊन झोपी गेले होते. रूमचा दरवाजा उघडा ठेवला होता. चोरट्यांनी उघड्या दरवाजातून आत प्रवेश करून मंडळकर यांच्यासह संकेत पोंदे यांचा मोबाईल चोरून नेला. सदरचा प्रकार रविवारी (दि. २८) सकाळी साडेसात वाजता लक्ष्यात आला.

# कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी हे मोदी सरकारच्या विजयाचे सुत्र

### खा. डॉ. सुजय विखे पाटील । जामखेड येथे महायुतीची कॉर्नर बैठक

**● जामखेड । वीरभूमी –**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या पर्वाची दमदार वाटचाल सुरू असून येत्या ४ जून रोजी त्यावर शिक्कामोर्तब होणार असल्याचा विश्वास खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला. मागील १० वर्षात केलेल्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी हे मोदी सरकाच्या विजयाचे सुत्र असून देशात मोदींची हमी टिकणार असेही त्यांनी सांगितले. ते जामखेड मधिल महायुतीच्या कॉर्नर मिटींग मध्ये बोलत होते.



नगर लोकसभेच्या निवडणुकीच्या मतदानाला आता कमी दिवसांचा अवधी उरला असल्याने महायुतीकडून आपल्या प्रचार सभांचा वेग वाढविला आहे. त्यांच्या प्रचारार्थ जामखेड मधील जायभायवाडी येथे महायुतीच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार राम शिंदे यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. विखे म्हणाले की, देशाच्या विकासात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दशकाच्या पर्वात घेतलेले निर्णय देशासाठी महत्वाचे ठरले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली देश विकसित देशाकडे वाटचाल करत आहे. आत्मनिर्भर भारत योजनेच्या माध्यमातून उद्योगधंद्यांना नवी दिशा दिली. मोदी सरकारचे वेगळेपण म्हणजे कलम ३७०, तीन तलाख, राम मंदिर, समान नागरी कायदा हे सुत्र होय. सर्वांना सारखाच न्याय देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. यामुळे जनता त्यांच्यावर खुष असून त्यांना पुन्हा देशाच्या शिरस्थानी बसविणार आहे. यामुळे आपल्या मताची किंमत ओळखून मतदारांनी देशाची सुत्रे कुणाच्या हाती द्यायचे आहेत याचा विचार करून मतदान करा असे त्यांनी यावेळी सांगितले. आ. राम शिंदे यांनी सुद्धा यावेळी मतदारांना संबोधित केले. आपले मत हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सरळ पोहचणार आहे. यामुळे महायुतीचे उमेदवार डॉ. सुयज विखे यांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

## निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर अकोले शहरातून पोलिसांचे संचलन



**● अकोले । वीरभूमी –**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोले पोलीस स्टेशन हद्दीतील कोतुळ येथें आज मंगळवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास सशस्त्र पोलिस दलाने पथसंचलन केले.

शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी तिसऱ्या टप्प्यात १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यादृष्टीने कोतुळ येथे शहरातील संवेदनशील आणि मिश्रवस्ती भागात उपविभागीय पोलिस अधिकारी सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्य राखीव पोलिस दल आणि स्थानिक पोलिसांनी पथसंचलन केले.

कोतुळ येथील मतदान केंद्राची पाहणी करून सुरक्षितेबाबत आढावा घेतला. पोलीस निरीक्षक गुलाबराव पाटील यांचे सह तीन पोलीस उपनिरीक्षक राज्य राखीव पोलिस दलाचे अधिकारी व जवान, यांच्यासह अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

## कोपरगाव शहरात भरगच्च कार्यक्रमांनी युवानेते विवेक कोल्हे यांचा वाढदिवस साजरा

**● कोपरगाव । वीरभूमी –**

सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सह. साखर कारखान्याचे चेअरमन तथा संजीवनी युवा प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष श्री. विवेकभैय्या कोल्हे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत कोपरगाव शहरात विविध भागात महिला भागीणींनी औक्षण करीत भरगच्च कार्यक्रमात वाढदिवस मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात साजरा केला.



कोपरगाव शहरातील शिंगणापूरातील संजीवनी गेट, दत्तमंदिर, बागुल वस्ती, शारदानगर, खडकी, बाबा चौक, मोहिनीराजनगर, क्रांतिचौक, गजानननगर, इंदिरानगर, साईनगर, तुळजाभवानी मंदिर बाजार तळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, आदीसह ठिकाणावर जाऊन विवेक कोल्हे यांनी कार्यकर्ते व मित्र परिवाराचे सत्कार घेतले भव्य अशी रॅली काढली होती. तालुक्यातील हजारो तरुण या मध्ये शुभेच्छा देण्यासाठी सहभागी झाले होते. शेकडो वाहनांचा ताफा सोबत होता.

याप्रसंगी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान,भाजपाचे शहराध्यक्ष डी. आर. काले, भाजयुमोचे अध्यक्ष सिद्धार्थ साठे, माजी नगराध्यक्ष संजय सातभाई, रवींद्र पाठक योगेश बागुल, माजी नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे,विजय वाजे, दीपकराव वाजे, आकाश वाजे, जितेंद्र रणशूर, कालू अप्पा आव्हाड, सतीश काकडे, रोहित वाघ, कैलास सोमासे, रोहित कनगरे, सतीश त्रिभुवन, दादाभाऊ नाईकवाडे, जनार्दन कदम, दादू काकडे, सोमनाथ म्हस्के, फिरोज पठाण, महेश दुशिंग, आशिष निकुंभ, मयूर लचुरे, योगेश अमृतकर, दीपक जपे, दिलीप सोनवणे, रवी रोहमारे, विजय चव्हाणके आदीसह कार्यकर्त्यांनी सत्कार केले.

# पाथर्डी तालुक्यात उष्णतेबरोबरच पाणीटंचाईची तीव्रताही वाढली

### ८० गावांसह ४०४ वाड्यावस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा । पाणीयोजनेवर टँकर भरत असल्याने शहरातील पाणीपुरवठाही विस्कळीत

**● पाथर्डी । वीरभूमी –**

उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून भूगर्भातील व भुपृष्ठावरील पाण्यासाठी झपाट्याने घटत आहेत. तहानलेले जनता सध्या फक्त पाणी मागत आहे. पाण्यासाठी आक्रोश सुरू आहे पाणी आणायचे कुठून? असा प्रश्न प्रशासनापुढे पडला आहे. तालुक्यात आज अखेर ८० गावी व ४०४ वाड्यांवरील एक लाख ६२ हजार ७४६ लोकांना टँकरने पाणी पुरविले जाते. जायकवाडी योजनेवरील टाक्या एवढा एकच शाश्वत उद्भव तालुक्यापुढे असून यामुळे योजनेवरील पाणीपुरवठा योजना पूर्णपणे विस्कळीत झाल्या आहेत.

तालुक्यात १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून पिण्याच्या पाण्यासाठी व पशुधन वाचवण्यासाठी तीव्र टंचाई असलेल्या भागातील लोकांना पाणी असलेल्या भागात जाऊन स्थलांतर करण्याशिवाय पर्याय नाही एवढी भयंकर परिस्थिती आहे. तालुक्यात खाजगी पाणीसाठा, विहिरी, बोअर दाखवा, आम्ही ते ताब्यात घेतो अशी कठोर भूमिका स्थानिक प्रशासनाने घेतले असून पाणी घरात सुरक्षित ठेवून दिवसा दाराला कडी कुलूप लावून ग्रामीण भागातील ग्रामस्थ शेती काम व मजुरीसाठी जात आहेत. टँकर गावात येण्याची चाहूल लागताच टँकरच्या थांब्यापर्यंत धावत पळत जाऊन नंबर लावतात. घरातील प्रत्येक व्यक्ती नंबर ला थांबतो. जेवढे पाणी वाटेला येईल त्या पाण्यातच तहान भागवणे, पाण्याची दैनंदिन गरज भागवणे व त्याचाच पुनर्वापर करून जनावरांची तहान भागवणे अशी साखळी सध्या सुरू आहे. हातामध्ये पाण्याची रिकामी बाटली बघितली तरी जनावरे आशाळाभूतपणे त्या बाटलीकडे बघत बसतात. दावणीमध्ये स्वतःभोवतीच फेऱ्या मारणारे जनावर बघताना शेतकऱ्याच्या डोळ्यांमध्ये अक्षरशः पाणी येते. ज्याच्याकडे जेमतेम पिण्यासाठी पाणी आहे असे गावातील रहिवासी हंडाभर पाणी सुद्धा लवकर कुणाला देत नाहीत.

पाथर्डी शहरातील परिस्थिती तर जायकवाडी योजनेवरील अमरापूर येथील साठवण टाकीवर भरल्या जाणाऱ्या टँकर मुळे आटोक्याबाहेर गेली असून यापूर्वी तीन दिवसांत होणारा पाणीपुरवठा आता दहा ते बारा दिवसांवर जाऊन पोहोचला आहे. पाण्यासाठी दाही दिशा फिरणाऱ्या लोकांना टँकर वाल्याच्या मागे लागून विकत टँकर मिळेल त्या भावात घ्यावा लागतो. ज्या दिवशी लग्न तिथे असेल त्या दिवशी टँकरचा भाव दुप्पट असतो.

इतर वेळी बुकिंग करावे लागते. देईल ते पाणी, देईल त्यावेळेस पाणी, व मागेल तेवढी किंमत टँकर विक्रेत्याला दिल्यानंतरच टँकर घरी पोहोच होते. सध्या दीड ते दोन हजार लिटर टँकरचा पाण्याचा भाव एक हजार रुपयांपर्यंत गेला असून अहोरात्र अशा खेपा चालतात. याबाबत ज्या व्यक्तीकडे बऱ्यापैकी पाणी साठा आहे त्या व्यक्तीला निम्मे पैसे द्यावे लागतात, आम्हाला मजुरी सुद्धा सुटत नाही असे टँकर चालक स्पष्टपणे म्हणतात. पाणी विक्रेत्यांकडे पाणीसाठा असेल तर शासनाने ते



साठे सुद्धा अधिग्रहित करून तेथे टँकर भरून शहराला पुरवण्याची गरज आहे. सध्या निवडणुकीच्या धामधुमीत नेते व कार्यकर्ते प्रचारात गुंतले आहे असे चित्र सांगितले जात असले तरी ग्रामीण भागात गेल्यावर मताचे जाऊ द्या हो' अगोदर पाण्याचे बोला ग्रामीण भागातील रहिवासी पाण्यासाठी कोणीही नेता आला तर त्याला धारेवर धरतात. त्यामुळे पाणी प्रश्न यंदाच्या निवडणुकीत संवेदनक्षम म्हणून कार्यकर्ते व स्थानिक पातळीवरचे नेते मतदारांपर्यंत अजून पोहोचलेलेच नाहीत.

कोण काय बोलेल, कोणाला कसे उत्तर द्यावे लागेल, याची भीती आता सर्वांना वाटत असल्याने निवडणूक अजून मतदारांपर्यंत पोहोचलेली नाही याला मुख्य कारण पाणीटंचाई तीव्र दुष्काळी परिस्थिती असेच आहे. तालुक्यात सध्या ८९ टँकरद्वारे विविध गावे व वाड्यांना पाणीपुरवठा होतो. टँकरची अवस्था बघितल्यानंतर गावापर्यंत टँकर पूर्ण भरलेला जाईल याची शाश्वती देता येत नाही. टँकर चालकाला तर शिक्षणाच्या अभावामुळे प्रशासकीय कामे व लोकसंपर्काचा अनुभव नसल्याने लाभार्थी व चालकांमध्ये विविध गावांमध्ये मतभेदाचे प्रसंग टोकाला जातात. टँकर पुरवणाऱ्या ठेकेदाराकडे दुरुस्तीसाठीचे युनिट व या सर्वांवर नियंत्रण करणारा समन्वयक असे पद नसल्याने तालुका प्रशासनाची धावपळ उडून प्रसंगी टँकर पुरवठा यंत्रणेमधील विस्कळीतपणा दूर करण्यास मोठा अडथळा निर्माण होतो.

बऱ्याच टँकर चालकांना लॉक बुक भरता येत नाही. काही जणांना लिहिता वाचता येत नाही. तर बरेच चालक टँकर नादुरुस्त झाल्यास जागेवरच उभा राहून मदतीची वाट बघतात. या सर्वांमध्ये समन्वयक असल्यास सुसूत्रता वाढून याच यंत्रणेद्वारे आणखी किमान दहा गावांना पाणीपुरवठा सुरळीत होऊ शकतो. गळणाऱ्या टँकरची दुरुस्ती ठेकेदाराने त्वरित करण्याची आवश्यकता आहे. यापूर्वी लग्नसराई मध्ये जेवणाच्या पदार्थांजवळ आचारी थांबत, विशेषतः गोड पदार्थ भोवती सुरक्षा असे. यंदा जेवणाकडे कोणी ढुंकूनही बघायला तयार नाही, मात्र पाण्याच्या बाटल्या भरून नेऊ नयेत म्हणून लग्नातील पाणी साठ्यावर एका जार भोवती दोन व्यक्ती थांबून ग्लासाने लोकांना पाणी वाटत आहेत. सुदैवाने यंदा मे महिन्यात फारशी लग्नसराई नसल्याने थोडासा दिलासा मिळाला आहे. मात्र जून मध्ये पुन्हा लग्नसराई सुरू झाल्यानंतर पाण्याची मागणी आणखी दुपटीने वाढणार आहे. प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांची पाणीटंचाई संदर्भात दिवसातून किमान दोन वेळा ऑनलाइन चर्चा होते. आलेल्या समस्यांचे तात्काळ निराकरण करत पाणीपुरवठा सुरळीत राहण्यास प्राधान्य दिले जाते. मध्यंतरीच्या वादळ वाऱ्याने जायकवाडी योजनेवरील वीजपुरवठा खंडित झाल्याने टँकर पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला. त्याचा परिणाम पाथर्डी शहरालाही पाणीटंचाईचा फटका बसला. स्थानिक प्रशासनाने तातडीने हालचाली करत वीजपुरवठा सुरळीत केल्यानंतर पाणी सुरू झाला. ठेकेदार कंपनीने स्थानिक प्रशासनाबरोबर संपर्क ठेवल्यास टँकर मधील गतिमानता वाढून टँकर ग्रस्त गावांना सुद्धा वेळेवर पाणी मिळू शकते. पाथर्डी शहरात तर पाण्यासाठी त्रस्त नागरिकांनी लोकसभा निवडणुकीवरच बहिष्कार घालण्याचे जागृती अभियान सर्वपक्षीय नेत्यांकडून हाती घेतले जाऊन पिण्यासाठी पुरेसे पाणी द्या तरच मतदान करू अशी भूमिका घेतली आहे.

शहरातील पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी फोन बंद करून बसतात किंवा फोन उचलत नाहीत. यामुळे संघर्षाचे प्रसंग वाढून पालिका कार्यालयावर पाण्यासाठी दररोजच मोर्चे ठरलेले आहेत. संतप्त नागरिक कार्यालयात येतात. तीव्र शब्दात मनमोकळे करून निघून जातात. सर्व कर्मचारी निमुटपणे लोकभावना ऐकून घेत, पाणी येईल एवढेच उत्तर देतात. संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता सर्व धरणांचे पाण्यासाठे राखीव ठेवण्याऐवजी निवडणुका डोळ्यापुढे ठेवून पाण्याचे आवर्तन सोडले जात असल्याबद्दल नागरिकांनी चिंता व्यक्त केली. यंदाची पाणीटंचाई अभूतपूर्व असून भूगर्भातील पाणी साठे संपत चालले आहेत. शहरातील बहुतांशी बोअर आटले आहेत. यापूर्वीच्या दुष्काळी परिस्थितीमध्ये भूगर्भात पाणी होते, मात्र ते सोयीचे नसल्याने बहुतेक गावांमध्ये टँकर दिले जाई. आता मात्र पाणी कोठेच नाही अशी परिस्थिती असून पशुपक्षांसह पाण्यासाठी जनावरांचे हाल बघवत नाहीत एवढी भयंकर परिस्थिती निर्माण झाल्याने सर्वच नागरिकांनी पाणी अत्यंत जपून वापरण्यामुळे असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# देशाला मोदींसारख्या कणखर नेतृत्वाची गरज

## जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले । नगर तालुक्यात विविध गावांत कॉर्नर बैठका

**● नगर । वीरभूमी –**

देशाला एका कणखर नेतृत्वाची गरज आहे आणि नरेंद्र मोदी हेच त्याला पर्याय आहेत. यामुळे नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराला विजयी करा, असे आवाहन माजी मंत्री तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले यांनी केले.

नगर तालुक्यातील विविध गावांत जिल्हा बँकेचे शिवाजीराव कर्डिले यांनी बैठका, कॉर्नर मिटिंग, सभा घेतल्या, यावेळी ते बोलत होते. यावेळी महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कामाबद्दल मतदारांना माहिती दिली.

महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या मेळाव्याचे इमामपूर येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाजार समिती संचालक मधुकर मगर दत्ता तापकीरे धर्मनाथ आव्हाड, खविसंचे व्हा. चेअरमन डॉ. मिनीनाथ दुसुंगे, संचालक डॉ. राजेंद्र ससे, आदेश भगत, सुरेश वारूळे उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने देशात मागील १० वर्षात विविध विकास कामे करून देशाला प्रगतीच्या पथावर आणले आहे. शेतकरी, कष्टकरी, तरूण, महिला आणि विद्यार्थांसाठी विविध योजना राबविल्या आहेत. यामुळे देशातील प्रत्येक घटकाचा विकास झाला. यामुळे येणाऱ्या काळात पंतप्रधान मोदींच्या हातात देश अधीक बळकट आणि सुरक्षित होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महायुतीचा उमेदवार हा प्रतिमोदी असून तुमचे मत हे सरळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळणार आहे. म्हणून महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी काम करा असे आवाहन त्यांनी केली. खा. सुजय विखे पाटील यांनी आपल्या खासदारीच्या काळात केलेल्या कामांची माहिती त्यांनी मतदारांना दिली. येणाऱ्या काळात अहिल्यानगच्या विकासासाठी एक तरूण आणि महत्वाकांक्षी खासदार आपल्याला निवडून द्यायचा आहे असेही ते म्हणाले.



आपल्या भाषणात खा. सुजय विखे म्हणाले की, विखे कुटुंबाने विकास हेच ध्येय ठेऊन नगरसाठी काम केले आहे. माझ्या पाच वर्षाच्या छोटाशा काळात मला जितके शक्य झाले, तितकी विकासकामे केली आहेत आणि ती कामे आज नगरमध्ये दिसतात. येणाऱ्या काळातही पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली नगर जिल्ह्यात जास्तीत जास्त निधी मिळवून विकास कामे केली जातील. त्यात पायाभूत सेवा सुविधांपासून अत्याधुनिक सेवांचा समावेश आहे. नगरमधील विविध प्रश्न येणाऱ्या काळात संसदेत मांडून त्याचे समाधान केले जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.

## काँग्रेसच्या पाथर्डी शहराध्यक्षपदी रवींद्र पालवे

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पदावर काँग्रेसचे युवा कार्यकर्ते रवींद्र शंकरराव पालवे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. विधिमंडळ पक्षाचे गटनेते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते नुकतेच त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंतराव वाघ, जिल्हा उपाध्यक्ष संपतराव म्हस्के, बाबासाहेब गुंजाळ पाथर्डी तालुकाध्यक्ष नासीर शहानवाज शेख ,सेवादल अध्यक्ष किशोर डांगे, जिल्हा सरचिटणीस प्रा. जालिंदर काटे, युवक काँग्रेसचे जुनेद पठाण, राहुल ढाकणे, सुनील दौंड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



रवींद्र पालवे काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. गेल्या दहा वर्षापासून काँग्रेस पक्षाचं कार्य अत्यंत प्रामाणिकपणे ते करत असून शहर व तालुक्यामध्ये काँग्रेसची उभारणी करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. पालवे पक्षाचे काम निः स्वार्थी भावनेने अत्यंत प्रभावीपणे करत आहेत. पक्ष संघटन मजबूत करण्यामध्ये त्यांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान असल्याने वरिष्ठांनी त्यांच्या कार्याची विशेष दखल घेऊन त्यांची नियुक्ती केली आहे. काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष कै. शंकरराव पालवे यांचे ते चिरंजीव असल्याने काँग्रेस पक्षाच्या विचारसरणीचा त्यांना फार जुना वारसा आहे. या निवडीचे सर्वत्र स्वागत करण्यात येत असून पाथर्डी शहरामध्ये त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## शेवगावात श्री स्वामी समर्थ केंद्राच्यावतीने श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम

**● शेवगाव । वीरभूमी –**

अखिल भारतीय श्रीस्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र दिंडोरी प्रणित गुरुपिठाच्या शेवगाव येथे स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त आज मंगळवार दि. ३० एप्रिल ते ६ मे २०२४ अखेर येथील खंडोबानगरमध्ये श्री गुरुचरित्र पारायण अखंड नाम जप तप यज्ञ सेवा सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



यानिमित्त सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, ८:१५ वाजता नित्यस्वाहाकार, ८:३० वाजता गुरुचरित्र पारायण, नैवेद्य आरती, विशेष याग, दुर्गा सप्तशती व श्रीस्वामी चरित्र पाठ, औदूंबर प्रदक्षिणा, नैवेद्य आरती व नित्यसेवा व नित्यध्यान असे दैनंदिन कार्यक्रम आहेत.

मंगळवारी सप्ताह प्रारंभ होऊन प्रहरे व गुरुचरित्र पारायणास प्रारंभ करून अग्निस्थापना करून नित्य स्वाहाकार करण्यात आला. उद्या बुधवारी श्रीगणेश याग, मनोबोध याग, गुरुवारी श्रीस्वामी याग, शुक्रवारी चंडी याग (कुलदेवीची उच्च कोटीची सेवा), शनिवारी श्रीगिताई याग, रविवारी श्री रुद्र याग व श्री मल्हारी याग अशा विधिसह रोज नित्यस्वाहाकार होणार आहे.

सोमवारी दि. ६ मे रोजी श्रीगुरुचरित्र पारायण समाप्ती, नित्यस्वाहाकार, बलिप्रदान पूर्णाहूती, श्री सत्यदत पूजन सकाळी १०:३० वाजता महानैवेद्य आरती व देवता विसर्जन व अखंड नाम जप तप यज्ञ सप्ताह सांगता असे सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम आहेत.

तरी भाविकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

या सप्ताहासाठी केंद्रप्रमुख पृथ्वीराज देशमुख, मार्गदर्शक उद्धवराव सोनवणे, सुहास धस, अशोक नलवडे, बंडू भोर, अशोक कांबळे, तारा रेवाडकर, मिना ढाकणे, शिला अभंग यांनी विशेष योगदान दिले आहे.

## उमेदवारांना चिन्हांचे वाटप

**● नगर । वीरभूमी –**

लोकसभा निवडणुकीसाठी नगर लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवारांना त्यांच्या मागणीनूसार आणि उपलब्ध असणार्या चिन्हांचे वाटप करण्यात आहे. यात श्रीगोंदा तालुक्यातील अपक्ष उमेदवार गोरख दशरथ आळेकर यांना निवडणूक निर्णय अधिकारी सिध्दराम सालीमठ यांनी तुतारी चिन्ह बहाल केले आहे. हे राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाचे उमेदवारे नीलेश लंके यांच्या चिन्हापेक्षा वेगळे असले तरी त्याच्या नावात साम्य आहे. लोकसभा निवडणुकीसाठी सोमवारी (दि.२९) उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशी दुपारी ३ तिननंतर राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पक्षाच्या उमेदवारांची चिन्हे वगळून शिल्लक असणार्या अन्य चिन्हापैकी प्रत्येकी एका चिन्हाचे वाटप करण्यात आले.

यात श्रीगोंदा तालुक्यातून नगर लोकसभा लढवणारे अपक्ष उमेदवार आळेकर यांना तुतारी चिन्ह मिळाले आहे. लोकसभा निवडणूक लढवणारे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे उमेदवार यांचे चिन्हे तुतारी वाजवणारा माणूस आहे. यामुळे मतदानादरम्यान मतदारांचा नावातील साम्यामुळे गोंधळ होण्याची शक्यता आहे. मात्र, निवडणूक निर्णय अधिकारी सालीमाठ यांनी ही शक्यता फेटाळून लावली असून यामुळे आळेकर यांना तुतारी चिन्ह देण्यात आले आहे. उर्वरित अपक्षांमध्ये आरती किशोरकुमार हालदा (प्रबुध्द रिपब्लिकन पार्टी) यांना ऑटो रिक्षा, कलीराम बहिरू पोपळघट (भारतीय नवजवान सेना पक्ष) यांना डिश एंटिना, डॉ. कैलास निवृत्ती जाधव (महाराष्ट्र विकास आघाडी) यांना गॅस सिलेंडर, रवींद्र लिलाचंद कोठारी (राष्ट्रीय जनमंच) यांना शिट्टी, दत्तात्रय आप्पा वाघमोडे (राष्ट्रीय जनक्रांती पार्टी) यांना दूरध्वनी, दिलीप कोंडीबा खेडकर (वंचित बहुजन आघाडी) यांना किटली, भागवत धोंडीबा गायकवाड (समता पार्टी) यांना बॅटरी टॉर्च, मदन कानिफनाथ सोनवणे (राईटू रिकॉल पार्टी) यांना प्रेशर कुकर, रावसाहेब शंकर काळे (बहुजन मुक्ती पार्टी) यांना खाट, भाऊसाहेब बापूराव वाबळे (भाजकिप) यांना भेटवस्तू, शिवाजी वामन डमाळे (सै.स.प) यांना बांगड्या, अमोल विलास पाचुंदकर (अपक्ष) यांना फलंदाज, मच्छिंद्र राधाकिसन गावडे (अपक्ष) यांना गॅस शेगडी, गंगाधर हरीभाऊ कोळेकर (अपक्ष) यांना जात, नवशाद मुन्सीलाल शेख (अपक्ष) यांना एअर कंडिशनर, प्रवीण सुभाष दळवी (अपक्ष) यांना उस शेतकरी, बिलाल गफूर शेख (अपक्ष) यांना सफरचंद, महेंद्र दादासाहेब शिंदे (अपक्ष) बॅट, ॲड. मोहम्मद जमीर शेख (अपक्ष) यांना कपाट, अनिल गणपत शेकटकर (अपक्ष) यांना रोड रोलर, सुर्यभान दत्तात्रय लांबे (अपक्ष) यांना हिरा या चिन्हांचा समावेश आहे.


Godavari Biorefineries Ltd

सर्व जनतेला व कामगारांना




Somaiya GROUP

GODAVARI BIOREFINERIES LTD.

We are a Biorefining company producing sugar, chemicals and waxes

- Industrial Grade sugar
- Rectified Sprit
- Acetic Acid
- Sorbic Acid
- 1, 3, Butylene glycol
- Ethyl Lactate
- Crotonaldehyde Diurea
- Bio Butanol
- Ethyl Vinyl Ether
- Pharma Grade Sugar
- Perfumery Grade Alcohol
- Ethyl Acetate
- 3-Methyl-3-Penten-2-one
- Triethoxy Butane
- Pharma Grade Alcohol
- Triacetin
- Bio Butyl Acetate
- Acetaldehyde Diethyl Acetal
- Extra Neutral Alcohol
- Acetaldehyde
- Crotonaldehyde
- Paraldehyde
- Crotononitrile
- Nautrowax
- Sorbaldehyde
- Cinnamaldehyde

Register Office

Somaiya Bhavan, 45-47, MG Road, Post Box No.384
Fort, Mumbai-400001, Pn.no.022-22048272, 22858430

Factory

1. Po, Sakarwadi-413708, Tal-Kopargaon, Dist- Ahmednagar (M.S)
2. Sameerwadi (via Mahalingpur) , Dist. Bagalkot, Karnataka,